१२४५६

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय ... बा. वा.
दा. क्र. १२४५६

# मिनाला पडलेलं कोडं.

IRBK-0112456

प्र. सं. वाचनालय
विषय
दा. क.
ह. सं १९६८
दा. अं. ११३६५
नोंद क्र. १२४५६

# मौना[illegible]

# पहले[illegible]

# को[illegible]

IRBK-0112456

म. ग्रं. सं. वाचनालय
विषय कादंबरी
दा. क्र. २९७६८
नं. ५५३

# …डलेलं कोडं



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :– खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

[कृ. मा.

# मीनाला पडलेलें कोडें

व

इतर गोष्टी

नों. ११३५
वा न ३५४

दत्ता चित्रे

१२०५९

पद्म प्रकाशन लिमिटेड

मुंबई

आठ आणे

आमच्याकडे मिळणारें
बालप्रकाशन

मुलांचा मेवा–सई परांजपे–८ आणे

मिटुकल्या गोष्टी–प्रा. चिं. वि. जोशी–
१२ आणे

माझी आवड–कृ. स. केळकर–१२ आणे

उषा–श्री. दि. ल. देवधर–३ आणे

चिरंजीव–रत्नप्रभा घारपुरे–६ आणे

तीन सोनेरी केस–कृ. स. केळकर–४आणे

शाळेसाठीं–दि. ल. देवधर–३ आणे

सुशीलेचा भाव–दि. ल. देवधर–२॥ आणे

प्रथमावृत्ति

सर्व हक्क स्वाधीन

हें पुस्तक श्री. रा. का. तटणीस यांनीं श्रीलक्ष्मी-नारायण प्रेस, मुंबई २ येथें छापिलें व श्री. मोरारजी पद्मसी यांनीं पद्म प्रकाशन लिमिटेडसाठीं लक्ष्मी बिल्डींग, फिरोझशहा मेहता रोड येथें प्रसिद्ध केलें.

# मीनाची ओळख

बालवाचकांनो, हें पुस्तुकलं वाचण्यापूर्वी तुम्हांला एक गोष्ट सांगायची आहे मला.

कव्हरावरील चित्रांत जी लहानशी छोकरी दगडावर बसून कसला तरी विचार करतेय् ना? तिचं नांव आहे मीना. नेहमीं हिच्या मनांत नवनव्या कल्पना येतात. आणि ही असाच विचार करीत बसते. मग मीं तिला तशा स्थितींत पाहिलं कीं हळूंच तिच्या पाठीमागें जातों अन् विचारतोंः

"काय चाललंय् मीना?"

मला पाहतांच ती आढेवेढे न घेतां तिच्या मनांतील विचार सांगते. अशाच रीतीनें तिनें मला तिचे जे कांहीं विचार सांगितले आहेत, त्याच विचारांना मीं गोष्टींचं स्वरूप दिलं आहे.

—आणि त्याच गोष्टी मीं तिला पुन्हां सांगितल्या. तिला ह्या गोष्टी इतक्या आवडल्या, कीं त्या तुम्हांला सांगण्यासाठीं ती माझ्याजळ हट्टावून बसली. म्हणूनच आज मी तुम्हांला हें पुस्तुकलं वाचावयास देत आहे.

मीनाप्रमाणें ह्या गोष्टी तुम्हांला आवडतात कां? आवडल्या तर मला कळवा. मग मीनाच्या आणखी कांहीं नवीन गोष्टी मी तुम्हाला सांगेन.

राठोड भुवन,
ठाणें

**दत्ता चित्रे**

## अनुक्रमणिका


(१) मीनाला पडलेलें कोडें ... ... ...

(२) गुलाब ... ... ...

(३) शिकार ... ... ...

(४) चक़ाकतें तें सोनं नव्हे ! ... ... ...

(५) चोंच आणि चारा ... ... ...

(६) पतंग आणि ज्योति ... ... ...

# मीनाला पडलेलें कोडें

"आजी, आज आपल्या परसांतील मोगऱ्याचीं सारीं फुलं कुणी तरी तोडून नेलीं बघ !" आजीनें सांगितल्यावरून देवासाठीं फुलें तोडावयास गेलेली मीना हात हालवीत परत येत म्हणाली.

मीनाची आजी देवघरांतून बाहेर आली. मीनानें सांगितल्यावरून तिनें मोगऱ्याच्या झाडाकडे पाहिलें, तों खरेंच झाडावर एकही फूल नव्हतें. सकाळीं झाडावर फुललेलीं तीन चार फुलें कुणी तरी तोडून नेलीं होतीं.

"जाऊं देत मीना; कुणी तरीं चोरलीं असतील फुलं." असें म्हणून मीनाची आजी घरांत आली. तिनें मीनाला एक पैसा दिला व म्हटलें, "आपल्या दादाच्या शाळेजवळ तें माळ्याचं दुकान आहे ना ? तिथून आण फुलं विकत."

पैसा घेऊन मीना धांवत धांवत माळ्याच्या दुकानाकडे गेली.

"ए माळी, फुलं दे पैशाचीं देवाला. अगदीं लवकर लवकर दे–" असें म्हणून तिनें आपल्या फ्रॉकच्या खिशांत हात घातला. पण खिशांत तिला पैसाच सांपडेना. रस्त्यांतून धांवत येतांना तिचा पैसा खिशांतून पडला होता.

माळ्यानें मीनाला फुलें दिलीं आणि पैसा मागितला. मीनाजवळ पैसा नाहीं हें पाहतांच मीनाजवळील फुलें त्यानें परत घेतलीं. पैसा हरवला आणि माळी फुलें देत नाहीं हें पाहून मीना रडकुंडीला आली.

ती माळ्याच्या दुकानाजवळून तशीच परत फिरली, आणि घराकडे यायला निघाली.

घराकडे येतांना तिला वाटलें—आपण देवासाठीं फुलें नेलीं नाहींत, तर देव आपल्यावर रुसेल--चांगले चांगले कपडे घालायला द्यायचा नाहीं--आणि देव जर आपल्यावर फारच रागावला, तर झोंपल्यावर एखाद्या वेळीं कानदेखील कापायचा– कान कापायचा विचार मनांत येतांच मीना घाबरली.

कसेंही करून आपण देवासाठीं फुलें नेलीं पाहिजेत, असें तिला वाटलें, म्हणून ती रस्त्यानें पुढें पुढें जाऊं लागली.

थोडीशी पुढें गेल्यावर तिला एका लहानशा बंगल्यासमोर एक बाग दिसली. बागेंत खूप खूप फुलें फुललेलीं दिसलीं तिला !


गुलाबांवर पिवळीं, लाल, गुलाबी फुलें होतीं—मोगऱ्यावर टपोरीं पांढरीं फुलें होतीं—जाईच्या वेलीवर दुधासारखीं शुभ्र फुलें होतीं—शेवंतीला सोन्यासारखीं पिवळीं फुलें होतीं—

बागेंतील त्या फुलांकडे पाहतांच मीनाला फुलें तोडायचा मोह उत्पन्न झाला. पण लगेच तिचें मन म्हणालें—

" दुसऱ्याच्या बागेंतील फुलं त्यांना न विचारतां तोडणं म्हणजे चोरी आहे, मीना !"

" मग कुणाला विचारून तोडूं ? " ती स्वतःशींच पुटपुटली. तिनें बागेचें फाटक हळूच उघडलें. आंत पाहिलें; आंत तिला कुणीच दिसलें नाहीं. तिनें मनाशीं

ठरवलें, "तोडूं या आपण फुलं ! आपल्या बागेंतलीं फुलं नाहीं का कुणी तरी चोरलीं ? आणि देवासाठीं फुलं तोडणं म्हणजे चोरी नाहीं होणार !" तिनें भराभर चार–पांच फुलें तोडलीं. देवाला पुरेशीं फुलें झालीं असें वाटल्यावर ती बागेच्या फाटकाकडे यावयास निघाली, तों काय ! बागेचा माळी समोरच उभा !



" चोरटे–फुलं चोरतेस, नाहीं का ? तरी मी रोज म्हणतों, कुठं जातात माझीं फुलं ? " माळी म्हणाला.

माळ्यानें मीनाजवळील सारीं फुलें हिसकावून घेतलीं अन् तिला हांकलून दिलें. मिळालेलीं फुलें गेलीं असें पाहून मीना रडूं लागली.


बागेच्या फाटकाबाहेर आल्यावर तिच्या कानांत कुणीं तरी कुजबुजलें, "मीना–फुलं नेलीं नाहीं तर कान–"

आतां फुलें कुठून आणावींत हा मीनापुढें मोठाच प्रश्न उभा राहिला. ती रस्त्यानें घराच्या वाटेला लागली.

रस्त्यानें मीनाला एक म्हातारा माळी हातांत फुलांच्या माळा आणि टोपलींत फुलें घेऊन जातांना दिसला.

त्या म्हाताऱ्या माळ्याकडे पाहतांच मीनाच्या मनांत एक छानशी कल्पना आली.

त्या कल्पनेच्या आनंदांत ती त्या माळ्याजवळ गेली आणि आपल्या हाताच्या बोटांतील सोन्याची आंगठी माळ्याला देऊन म्हणाली, "खूप खूप पैशांची आंगठी आहे ही! मला लवकर खूप फुलं दे–खूप–माळा दे.."




आंगठीकडे पाहून म्हाताऱ्या माळ्याला आनंद झाला. त्यानें ती आंगठी घेतली व मीनाला पुष्कळ फुलें आणि माळा दिल्या.

फुलांबरोबरच आणखी माळा मिळतांच मीना आनंदातिशयानें धांवत धांवत घराकडे आली. घरीं आल्यावर आजीला म्हणाली, “आजी, पैसा हरवला म्हणून आंगठी देऊन बघ किती तरी फुलं आणि माळा

आणल्यात ! आतां नाहीं ना देव कान कापणार ? बाबांना खूप खूप पैसे देईल ना ?—"

आंगठी गेलेली पाहतांच आजी रागावली. " मूर्ख कुठली ! देव कुठं कान कापीत असतो ? आणि माणसाला पैसा काय देव देतो ? " आंगठी गेलेली कळतांच आजीचे देवाच्या अस्तित्वाबद्दलचे विचार बदललेले बाहेर पडले ! !

आंगठी आणण्यासाठीं आजी मीनाला घेऊन घराबाहेर पडली. रस्त्यानें रडत रडत जातांना मीना विचार करीत होता.

" देव कान नाहीं कापीत ? पैसा नाहीं देत ? एकदां आजीच सांगत होती ना ? देवाची पूजा केली, भक्ति केली, तर देव खूप पैसे देतो, आणि देव जर रागावला तर झोंपेंत कान कापतो—"

मग हें कसें ?—

मीना खूप विचार करीत होती. पण कांहीं केल्या मीनाला हें कोडें उकलेना !

# गुलाब

"दादा दादा, तो पाहा रे भुंगा आला तुझ्या गुलाबाकडे !" छोटी बेबी बागेंतून धांवत येत आपल्या दादाला फुलावर तुटून पडणाऱ्या शत्रूची बातमी सांगत होती.

विनायकनें हातांतील अभ्यासाचें पुस्तक दूर भिरकावलें अन् वाऱ्यासारखा तो त्या गुलाबाकडे धांवत गेला.

पण तिथें भुंगा नव्हता. केव्हांच उडून गेला होता तो ! आणि असता तर त्यानें त्याचा मैलभर पाठलाग करून त्याला दूर हाकलून दिलें असतें. त्याचें त्या गुलाबावर किती प्रेम होतें—

त्यानें त्या गुलाबाचें रोपटें लावलें, तेव्हां एकदां खूप जोराचा पाऊस आला. त्याला वाटलें अशा पावसानें रोपटें उन्मळून पडेल. कडाडणाऱ्या पावसाच्या धारा गुलाबावर पडूं नयेत म्हणून तो तासभर या रोपट्यावर छत्री धरून उभा होता !




रोज गुलाबाचें आळें स्वच्छ करायचें, झारीनें गुलाबाला पाणी घालायचें, पिकलेलीं पानें खुडायचीं, अशी किती तरी मशागत करायचा तो त्या झाडाची !

अन् त्याच्या त्या श्रमाचें फळ त्याला आज मिळालें होतें. त्याच्या गुलाबाला एक सुंदर फूल

आलें. त्या फुलाकडे पाहून त्याला खूप आनंद व्हायचा. आईचें पहिलें मूल, नी झाडावरचें पहिलें फूल, दोन्हीही सारख्याच आनंदाच्या गोष्टी असतात, असें म्हणतात.

त्याचा आनंदही तसाच होता. रोज फूल अधिकाधिक उमलायचें, फुलाबरोबर त्याचें मनही फुलायचें, नी त्याला विचारायचें—

" काय करशील ह्या फुलाचं तूं ? "

तें फूल आतां पूर्ण विकसित झालें होतें. विनूला वाटलें, आई म्हणतेय ना कीं झाडाचें पहिलें फूल देवाला वहावें ? मग काय हरकत आहे ?

पुन्हां त्याचें दुसरें मन म्हणे " देव दगडाचा ! त्याला कशाला हवींत फुलं ? अन् फुलासाठीं देव थोडाच रुसणार—रागावणार आहे आपल्यावर ! "

रोज रोज विनूचे विचार बदलायचे. एक दिवस त्याला वाटलें, " वर्गांतल्या तिवारीनं नाहीं का मास्तरांना छानसं फूल दिलं आपल्या बागेंतलं ! तसंच आपणही द्यावं अन् मास्तरांना सांगावं—"

“ मीं लावलेल्या गुलाबाचं फूल हें ! ”

पण पुन्हां त्याला वाटायचें, “ न जाणो, आपण फूल न्यावं आणि त्याच दिवशीं मास्तर कुणावर रागवावे आणि तो राग निघावा आपल्या फुलावर—”

हो, गोजिरवाण्या फुलावरच रागावण्यांत मास्तरांना अभिमान वाटतो. तसेंच झालें नी त्यांनीं आपलें फूल भिरकावून दिलें तर—त्याला पुन्हां वाटे, “ फूल देवाला वाहिलं, मास्तरांना दिलं, तरी तें पुष्कळशा लोकांना कसं कळणार ? ”

त्याला एकदां वाटलें “ आपल्या कोटाला लावावं फूल.”

पण तोही विचार फिरला. रोज त्याचे विचार बदलत.

शेवटीं त्यानें ठरविलें, “ खरंच, पहिलं फूल देवालाच वाहावं. उमलतील दुसऱ्या कळ्या, तेव्हां करूं आपण बाकीच्या गोष्टी.”

रात्रीं तो गोड विचारतंद्रींत झोपीं गेला. अन् पहांटेच्या थंड गार वाऱ्यानें जागा झाल्याबरोबर

आनंदानें उठला. खोलीचें दार उघडलें.—थेट बागेंत गेला तो—पण झाडावर फूल कुठें होतें ?

आपल्याजवळचा मौल्यवान् ठेवा कोणी तरी हिरावून न्यावा तसें दुःख झालें त्याला. त्यानें बागेच्या फाटकाकडे पाहिलें. तें बंद होतें. पुन्हां आजूबाजूला पाहिलें.

अन्—झाडाखालीं गळून पडलेल्या गुलाबाच्या पाकळ्या वाऱ्यानें सभोंवतालीं पांगवलेल्या दिसल्या त्याला.

# शिकार

माझी खेडयाला बदली झाल्यानंतर माझ्या शिकारीच्या नादाला विशेषच मोकळीक मिळाली होती. आणि माझा हा नाद वृध्दिंगत होण्यास हें आमचें छोटेंसें खेडेंच विशेष कारणीभूत झालें होतें.

ह्या खेडयापासून दोन मैलांवर एक जंगल होतें. त्यांत किती तरी निरनिराळ्या प्रकारचे प्राणी होते. हरिण, ससे, मोर, रानडुकरें आणि निरनिराळ्या प्रकारचे लहानमोठे पक्षी ह्यांनीं तें जंगल नुसतें गजबजून गेलें होतें.

रविवारचा दिवस म्हणजे माझा शिकारीचा दिवस असे. असाच एका रविवारीं मी माझी बंदूक घेऊन ह्या जंगलांत गेलों, आणि परत येतांना एका हरिणाची शिकार करून आलों.

मीं मारलेलें हरिण पाहून माझ्या धाकटया भावास—विनूस—आपणही शिकार करावी असें वाटलें, आणि "मीही उद्यां शिकारीला जाईन" असा हट्ट घेऊन बसला तो. आणि मीं त्याला परवानगी देतांच

दुसऱ्याच दिवशीं त्यानें त्याच्या भिल्ल कोळ्यांच्या छोट्या सोबत्यांना आपला बेत सांगितला. आणि त्या साऱ्यांनीं दुसऱ्याच दिवशीं शिकारीला जायचा बेत केला.

दुसऱ्या दिवशीं शेजारच्या भिल्लाच्या मुलानें आपल्या वडिलांचें पांखरें पकडण्याचें जाळें आणलें. आमच्या विनूनें जाळ्यांत ठेवण्यासाठीं खाद्य घेतलें आणि शिकारीची जय्यत तयारी केली. निदान आपण कोणी तरी मोठे शिकारी आहोंत असें त्याला वाटत होतें. त्यानें आपल्या हाफ पँटमध्यें आपला शर्ट खोंचला. बूट, मोजे चढविले. गळ्याला माझा खाकी रंगाचा रुमाल बांधला. वॉटरबॅगचें ओझें उचलत नसतांही ती कशीबशी गळ्यांत अडकविली. हातांत एक छडी घेतली, आणि आमच्या तपकिरी रंगाच्या मोत्या कुत्र्याला बरोबर घेऊन स्वारी आपल्या सोबत्यांसह शीळ घालीत शिकारीसाठीं बाहेर पडली.

"लांब नाहीं जायचं हं." मीं विनूला बजाविलें. "लांब नाहीं जाणार. ह्या रामूच्या शेतांत जाणार

आहों आम्हीं. तिथं खूप पांखरं आहेत. कधीं कधीं तूं मारलंस तशीं हरिणंही येतात तिथं, असं रामू म्हणतो. बघुं या मिळते का आम्हांला शिकार." असें म्हणत विनू आपल्या हातांतील छडी हालवीत त्याच्या संवगड्यासह शिकारीस गेला.

रामूच्या शेतांत गेल्यावर त्या भिल्लाच्या मुलानें जाळें पसरण्याची माहिती नसतांनाही कसें तरी जाळें पसरून ठेवलें, विनूनें आंत खाद्य टाकलें, आणि सर्व तयारी झाली असें पाहून मोत्यासह ते सारे दूर जाऊन बसले.

"एकाद्या तासानें कांहीं तरी शिकार येईल असा त्यांचा अंदाज होता. म्हणून तेवढा वेळ त्यांनीं रामूच्या शेतांत फिरण्यांत घालविला. मोत्याची जेवायची वेळ झाल्यामुळें विनूनें त्यास हुसकून दिलें. कारण, शिकारीच्या नादांत मोत्याचें खाद्य द्यावयाचें विसरले ते.

मोत्या निघून गेला—

फिरतां फिरतां एक तास होऊन गेला. कांहीं तरी शिकार सांपडली असेल, असें त्यांना वाटलें. भिल्लाचा मुलगा धांवत जाळ्याकडे गेला. त्यानें दुरूनच जाळ्याकडे पाहिलें. हरिणासारखें कांहीं तरी दिसलें त्याला.

" विनू, हरिण सांपडला, हरिण ! हरिण सांपडला आपल्या जाळ्यांत ! " भिल्लाचा मुलगा ओरडतच शेताकडे आला.

" काय हरिण ? " विनू आश्चर्यातिरेकानें म्हणाला.

धांवत धांवत विनूचे सारे सोबती माझ्याकडे आले. किती आनंद झाला होता त्यांना !

" दादा, दादा, हरिण सांपडलाय् जाळ्यांत. तूं चल ना. आम्हांला नाहीं काढतां यायचा तो. " विनूनें घरीं येतांच सांगितलें.

" वेडा--हरिण कुठं जाळ्यांत सांपडतात. " मी म्हणालों.

" तूं बघ तर खरं, भिल्लाच्या गोट्यानें पाहिला तो " विनू म्हणाला. मी जाळ्याकडे गेलों.

" तो पहा, भाऊ " गोट्यानें दुरूनच बोटानें दाखविलें.

मी जाळ्याजवळ गेलों. तों काय ! आमचा तपकिरी रंगाचा मोत्या कुत्रा जाळ्यांतील खाद्य फस्त करून आंत अडकून पडला होता.



तें पाहतांच विनूनें व त्याच्या मित्रांनीं घरीं जाईपर्यंत माना खालीं घातल्या होत्या.

आणि त्या दिवसापासून पुन्हां विनूनें कधींही शिकारीचें नांवही काढलें नाहीं—व मी शिकारीस गेलों तरी तो माझ्याबरोबर येण्याचा हट्टही धरीत नाहीं.


९२८५६

# चकाकतें तें सोनें नव्हे

एका घरांत खिडकीशेजारीं एका कोळ्याचें जाळें होतें.

खिडकींतून सूर्याचे किरण आंत आले कीं त्या जाळ्याचे तंतु चकाकत. बाहेर जोराचा पाऊस पडला कीं खिडकावाटे पावसाचे तुषार जाळ्यावर उडत व सूर्याचीं कोंवळीं उन्हें पडलीं कीं ते तुषार मोत्यांच्या सराप्रमाणें भासत—

त्या जाळ्यापलीकडेच अंधारांत दुसऱ्या एका कोळ्याचें जाळें होतें.



उन्हानें खिडकीजवळील जाळ्याचे तंतु चकाकले. मोत्यांचे सर लखलखले कीं अंधारांतील कोळ्याला मत्सर वाटे दुसऱ्या कोळ्याचा.

त्याला वाटे, किती सुंदर घर दुसऱ्या कोळ्याचें! आणि आपलें—

एकदां अंधारांतील कोळी दुसऱ्या कोळ्यास म्हणाला " दादा, मी येऊं तुझ्या जाळ्यांत ? आपण दोघेही राहूं तिथं. "

" कां ? तुला तर घर आहे तुझं. " दुसऱ्या कोळ्यानें विचारलें.

" पण मला नाहीं आवडत तें ! तुझं घर कसं छान ! सोन्यामोत्यासारखं चकाकतं नेहमीं. "

दुसरा कोळी हंसला. चकाकणाऱ्या साऱ्या वस्तु सोन्याच्या नसतात, हें कसें सांगणार तो दुसऱ्या कोळ्याला ?

" तूं येऊं नकोस इथं. " असें सांगून तो कोळी भक्ष्य शोधण्यासाठीं खालीं उतरला.

—आणि अंधारांत राहणाऱ्या कोळ्यानें ही संधि साधली! तो झटकन् दुसऱ्या कोळ्याच्या घरांत शिरला, आणि मनाशींच म्हणाला, "अहाहा! किती सुंदर हें घर! जणूं कांहीं राजवाडाच."—

थोड्या वेळानें तोंडांत भक्ष्य घेऊन दुसरा कोळी आपल्या घराकडे आला. पण पाहतो तों अंधारांतील कोळी आपल्या घरांत बसला आहे. तो कांहींही न बोलतां अंधारांतील जाळ्यांत जाऊन बसला.


—दोन्ही कोळ्यांचीं घरें बदललीं गेलीं.—

—पण सोन्यामोत्यांच्या जाळ्यांत राहणाऱ्या कोळ्याचा आनंद हळूहळू मावळला. दोनतीन दिवसांत भक्ष्याचा एक कणही अडकला नाहीं त्याच्या जाळ्यांत. बाहेर जाऊन भक्ष्य आणण्याचीही संवय नव्हती त्याला. भुकेनें तो व्याकुळ झाला आणि दुसऱ्या कोळ्याला म्हणाला, "मी येतों माझ्या घरांत, तूं रहा तुझ्या घरांत."

पण दुसऱ्या कोळ्यानें त्याला कांहीं उत्तरच दिलें नाहीं. सोन्यामोत्याच्या जाळ्याची हांव धरणाऱ्या

कोळ्याला भुकेनें ग्लानि आली. कांहीं दिवसांनीं त्याची सारी हालचाल बंद झाली !

दुसऱ्या दिवशीं एका पालीनें त्याला झडप घालून




दूर केलें. सोन्यामोत्यांचें जाळें राहिलें रिकामेंच—

त्या जाळ्याकडे पाहून रोज अंधारांतील कोळी म्हणूं लागला.

—'चकाकतं तेवढं सारं सोनं नसतं.'—

# चोंच आणि चारा

एका बोरीच्या झाडावर एका चिमणीचें घरटें होतें. त्या लहानशा घरट्यांत चिमणीचीं दोन लहानशीं बाळें रहात होतीं. सांजसकाळ चिमणी तिच्या लहान पिलांसाठीं दाणे आणि किडे आणण्यासाठीं बाहेर जाई आणि खाद्य आणल्यावर पिलांना भरवी—



एकदां काय झालें, सकाळींच ती चिमणी खाद्य आणण्यासाठीं बाहेर गेली, ती अंधार पडला तरी घरट्याकडे आली नाहीं. हें पाहून चिमणीचीं बाळें घाबरलीं. आईची वाट पाहण्यासाठीं तीं घरट्यांतून बाहेर डोकीं काढीत होतीं आणि आजूबाजूला पाहत होतीं.

तोंच त्यांना कुठून तरी आवाज ऐकूं आला-- "बाळांनो ! एका दुष्ट मुलानें तुमच्या आईला ठार मारलं; पण घाबरूं नका. ज्यानं तुम्हांला चोंच दिली आहे, तो तुमच्या चाऱ्याचीही व्यवस्था करील--"

आपल्या आईबद्दलची ती बातमी ऐकून त्या पिलांना अतिशय वाईट वाटलें. दुसऱ्या दिवशीं एक पिलूं दुसऱ्या पिलाला म्हणालें, "दादा, मला भूक लागली आहे रे !"

हें ऐकून दुसऱ्या पिलानें उत्तर दिलें, "घाबरूं नकोस--कालचा तो आवाज ऐकलास ना ?--ज्यानं चोंच दिली आहे तो चाऱ्याचीही व्यवस्था करतो."

खूप वेळपर्यंत तीं पिलें घरट्यांतच पडून राहिलीं. पण त्यांना चारा मिळाला नाहीं. शेवटीं एक पिलूं दुसऱ्या पिलाला म्हणालें, "कालचा तो आवाज खोटा असावा. कारण अजून आपल्याला खायला मिळत नाहीं. मला तर खूप भूक लागली आहे. मी जातों बाहेर." असें म्हणून एक पिलूं भुर्रकन् घरट्याबाहेर उडून गेलें.

बोराच्या झाडापलीकडील शेतांत कणसांतून गळून पडलेले भरपूर दाणे होते. त्या पिलानें ते दाणे खाल्ले. गवतावर चरणारे लहान लहान किडेही खाल्ले. तें घरट्याकडे परत आलें आणि दुसऱ्या पिलाला म्हणालें, "मिळाला चारा ?"

"नाहीं अजून--" भुकेलेलें दुसरें पिलूं म्हणालें.

तेव्हां पहिल्या पिलानें त्याला सांगितलें, "कालचा तो आवाज खरा होता. चोंच दिली तो चाराही देतो. तुलाही माझ्याप्रमाणं उडायची शक्ति आली आहे. माझ्याबरोबर चल घरट्याबाहेर; मी दाखवतों चारा."

तीं दोन्हीं पिलें घरट्याबाहेर पडलीं व त्या शेतांतील दाणे आणि किडे खातांना म्हणालीं, " जो चोंच देतो तो चाऱ्याचीही व्यवस्था करतो. पण आपण चारा शोधला पाहिजे. नुसतं घरट्यांत बसून उपयोगी नाहीं. "

# पतंग आणि ज्योति

डामरासारखा दाट काळोख पडला होता पतंगांच्या राज्यांत—

अन् असा अंधार पडला कीं साऱ्या पतंगांना आनंद व्हायचा—

आपल्या लहानग्या घराच्या दारांत उभें राहून त्या अंधाराकडे पाहतांना त्यांना वाटायचें, निघावें आपण सहलीला—

पण सारे पतंग होते राजनिष्ठ !—

आपल्या राजाच्या परवानगीवांचून ते जागचे हालत देखील नसत. मग सहलीची गोष्ट तर दूरच--

पण राजा आज स्वतःच त्यांना म्हणाला, "किती दाट काळोख पडला आहे. जाऊं या आपण सहलीला—"

अन् सारे पतंग राजा मागोमाग हांसत हांसत अंधाराचे गोडवे गात चालले होते.

ते थोडेसे पुढें गेले तोंच त्यांना कसला तरी प्रकाश दिसला.

त्या ठिकाणीं नवीनच स्थापन झालेल्या देवस्थाना-समोर तेवत असलेल्या पणतीची ज्योति होती ती—

अंधारप्रिय पतंगांच्या राजानें ज्योतीकडे बोट दाखवीत आपल्या प्रजेला विचारलें :

" काय आहे तें ? "

पण बिचारे पतंग !

त्यांनीं कधीं ज्योति पाहिलीच नव्हती, तर ते काय उत्तर देणार ?

कुणीच कांहीं बोलत नाहीं असें पाहून राजाचें पित्त खवळलें. अन् कां नाहीं खवळणार ?

आकाशांतून पृथ्वीवर प्रकाश उधळणाऱ्या तारकांचासुद्धां राग यायचा त्याला. मग स्वतःच्या राज्यांत येऊन प्रकाश निर्माण करणाऱ्या त्या ज्योतीबद्दल कां राग येऊं नये त्याला ?—पतंगांच्या राजानें तीराप्रमाणें धांवत जाऊन ज्योतीवर झेंप टाकून ती विझवण्याचा प्रयत्न केला. अन् राख झाली राजाची !

आपला राजा नाहींसा झाला हें पाहून सारे पतंग भांबावले—वेडे झाले—काय करावें हें त्यांना सुचेना.

ते सारे आपल्या राजाचा नाश करणाऱ्या ज्योतीवर तुटून पडले.

आणि कित्येक पतंगांची प्राणाहुति घेऊन ती ज्योति विझाली.

ते वेडेपिसे झालेले पतंग, वाट फुटेल तिकडे पळूं लागले. शेवटीं ते एका शहरांत आले. तेथें काय—साऱ्या ज्योतीच ज्योति—!

दिवाळी होती त्या शहरांत—सारे पतंग ज्योतींभोंवतीं घिरटया घालून त्यांना विझविण्याचा निष्फळ प्रयत्न करूं लागले.

अन् अजूनदेखील नाहीं का पतंग ज्योतींभोंवतीं घिरटया घालीत ?

एकीचें बळ करून आपल्या लहानग्या पंखांच्या वाऱ्यानें दिव्यांच्या ज्योति मालविण्याचा प्रयत्न करतात ते.

आणि लोक म्हणतात—

——पतंगांना ज्योति आवडतात, त्यांना त्याबद्दल ओढ वाटते.




१२८५६।

IRBK-0112456